## <u>नियमित दिवाणी दावा क्र.५८/२०१४ मधील</u>
## <u>निशाणी १११ वरील आदेश</u>

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.६ सुवर्णा भ्र. अशोक उबाळे ही दिनांक ०९.१०.२०१५ रोजी मयत झाली असून तिला अर्जात नमूद केलेले वारस हेच सरळ व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, अर्जात नमूद वारसांना या कामी वादी क्र.५ व ६ म्हणून समाविष्ट करण्याची विनंती वादी यांनी केली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांनी या अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी क्र.४ यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ शपथपत्र सादर करून अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. अभिलेखातील निशाणी ४१ वरील मृत्यू प्रमाणपत्र पाहता प्रतिवादी क्र.६ ही दिनांक ०९.१०.२०१५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादी यांनी हा दावा वाटपासाठी व दाव्याचे परिच्छेद क्र.५ मधील खरेदीखतांचे व्यवहार त्यांचे हक्कांवर बंधनकारक नसल्याचे घोषीत होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.६ यांचे वारसांविरुध्द दाव्याचे कारण पुढे चालू राहते. मयत प्रतिवादी क्र.६ हिचे वारस या दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, या कामी मयत प्रतिवादी क्र.६ यांचे अर्जात नमूद केलेले वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे :–

## <u>आ दे श</u>

१. वादी यांचा निशाणी १११ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** मयत प्रतिवादी क्र.६ यांचे अर्जात नमूद केलेले वारसांना वादी क्र.५ व ६ म्हणून अभिलेखावर घेणेसाठी वादी यांना परवानगी देणेत येत आहे.

**३.** वादी यांनी आज पासून १४ दिवसांचे आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी व अभिलेखावर दाव्याची दुरुस्त प्रत दाखल करावी.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.02.12 11:37:58 +0530

**दिनांक : ०६.०२.२०२५** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः वडवणी** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वडवणी,**

**ता. वडवणी, जि.बीड.**

## <u>Certificate</u>

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 06.02.2025 |
| Transcribed on | : | 06.02.2025 |
| Checked and signed on | : | 12.02.2025 |